जा.क्रजिपसा/पशुंस/मुक्त सं.गोठा/१६८५/२०१८
पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद,सांगली
दिनांकः- २१/०८/२०१८

**प्रति ,**

**मा. जिल्हा माहिती अधिकारी ,**
**मध्यवर्ती प्रशासकीय इमारत , विजयनगर , सांगली .**

**विषयः- सन २०१८-२०१९ मध्ये जिल्हा परिषद स्विय निधी मधुन गुराढोरांचा प्रकर्षित विकास अंतर्गत ५०% अनुदानावर मुक्त संचार गोठा तयार करणे या योजनेस व्यापक प्रसिध्दी देणे बाबत**

उपरोक्त विषयास अनुसरून पशुसंवर्धन विभाग ,जिल्हा परिषद सांगली या विभागामार्फत सन २०१८-१९ मध्ये जिल्हा परिषद स्विय निधी मधुन गुराढोरांचा प्रकर्षित विकास अंतर्गत ५०% अनुदानावर मुक्त संचार गोठा तयार करणे ही योजना राबविणेत येत आहे. सदर योजनांचे अर्ज तालुक्याच्या ठिकाणी पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती यांचे कार्यालयामध्येही उपलब्ध असून सदर कार्यालयामध्ये अर्ज पुर्ण भरलेले आवश्यक कागदपत्रासह स्विकारणेची मुदत दिनांकः-२७/०८/२०१८ ते २६/०९/२०१८ पर्यत राहील .

दिनांकः-२६०९/२०१८ नंतर प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.सदर योजनांच्या अर्जाचा नमुना जिल्हयाच्या www.sangli.nic.in व www.zpsangli.in या संकेतस्थळावर इच्छुक लाभार्थीना लाभ घेणेसाठी उपलब्ध ठेवण्यात आलेला आहे. तरी सदर योजनेस आपलेमार्फत विविध वर्तमान पत्रामध्ये माहिती देवून व्यापक प्रसिध्दी दयावी ही विनंती.

**तालुकानिहाय लक्ष खालीलप्रमाणे-**

| अ. क्र. | तालुका | अनुसुचित जाती (१३%) | रकाना क्र.३ सोडून(८७%) | एकुण लक्ष (रकाना ३+४) | रकाना क्र. ५ पैकी ( ३०%)महिला | रकाना क्र. ५ पैकी दिव्यांग (५%) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | Miraj | ६ | ३९ | ४५ | १३ | २ |
| २ | K. mahankal | २ | १५ | १७ | ४ | १ |
| ३ | Jath | ५ | ३२ | ३७ | ११ | २ |
| ४ | Atpadi | २ | १४ | १६ | ५ | १ |
| ५ | Khanapur | २ | १० | १२ | ३ | १ |
| ६ | Tasgaon | ३ | २१ | २५ | ७ | १ |
| ७ | Islampur | ६ | ३९ | ४५ | १३ | २ |
| ८ | Shirala | २ | १४ | १६ | ८ | १ |
| ९ | Palus | २ | १४ | १६ | ८ | १ |
| १० | Kadegaon | २ | १४ | १६ | ८ | १ |
| | **Total** | ३२ | २१२ | २४५ | ८० | १३ |

**सोबत :- अर्जाचा नमुना**

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
जिल्हा परिषद सांगली

**प्रत- माहीतीसाठी सविनय सादर**

१) मा.अध्यक्ष
२) मा.उपाध्यक्ष
३) मा.सभापती, व सर्व सन्माननीय सदस्य जिल्हा परिषद,सांगली.

**प्रत- माहीतीसाठी व उचित कार्यवाहीसाठी**

१. मा. जिल्हा प्रसिध्दी अधिकारी (nic कक्ष), जिल्हाधिकारी कार्यालय सांगली.
२/-कृपया सदरचे पत्र व अर्जाचा नमुना www.sangli.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध ठेवणेत यावा ही विनंती.
२. मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी , ( सा.प्र. वि .) जि.प. सांगली.
२/-कृपया सदरचे पत्र व अर्जाचा नमुना www.zpsangli.in या संकेतस्थळावर उपलब्ध ठेवणेत यावा ही विनंती.
३. मा. जिल्हा पशुसंवर्धन उप-आयुक्त ,सांगली. (मु. मिरज )
४. पशुधन विकास अधिकारी ( विस्तार ), पंचायत समिती , सर्व
२/-सदरचे अर्जाचा नमुना उच्छुक लाभार्थीना लाभ घेणेसाठी आपले कार्यालया मार्फत उपलब्ध ठेवावा तसेच योजनेस आपण व आपले तालुक्यातील संस्थामार्फत व्यापक प्रसिध्दी देणेत यावी. जेणेकरून जास्तीत जास्त लाभार्थीना या योजनेचा लाभ घेता येईल.

①

दिनांक - / /२०१८
अर्ज नोंदणी क्रमांक-

मागील ३ महीन्यातील पासपोर्ट आकाराचा रंगीत फोटो

# सन-२०१८-२०१९ मध्ये जिल्हा परिषद स्विय निधी मधुन गुराढोरांचा प्रकर्षित विकास अंतर्गत ५० % अनुदानावर मुक्त संचार गोठा तयार करणे
## (लाभार्थीने करावयाचा अर्जाचा नमुना)

प्रति,
मा.जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली.

विषय- सन-२०१८-१९ मध्ये गुराढोरांचा प्रकर्षित विकास अंतर्गत ५० % अनुदानावर मुक्त संचार गोठा तयार करणेचा लाभ मिळणेबाबत

१) अर्जदाराचे नाव -श्री./श्रीमती. ------------------------------------------------------------

२) पत्रव्यवहाराचा पत्ता- गावाचे नाव (मु.पो.) --------------------
तालुका---------------------------जिल्हा-सांगली.पिनकोड-------------
संपर्कासाठी अर्जदाराचा दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्र.--------------------------

३) अर्जदाराचे आजरोजीचे वय- (पुर्ण वर्षा मध्ये)---------- वर्षे (अर्जदाराचे वयोमर्यादा-१८ वर्षे ते ६० वर्षे)

४) लिंग -स्त्री /पुरुष . (लागू असेल त्यावर ✓ खूण करावी )

५)अर्जदार कोणत्या प्रवर्गाचा आहे - जात--------------प्रवर्ग-----------

६) अर्जदार अपंग आहे का ? होय/नाही (लागू असेल त्यावर ✓ खूण करावी व प्रमाणपत्र सादर करावे)

७) कुटुंब सदस्य संख्या - पुरुष---------महिला----------एकूण---------- (रेशन कार्ड नुसार)

८) अर्जदाराकडे सध्या उपलब्ध असलेल्या पशुधनाचा तपशिल - (योजनेस पात्रतेसाठी अर्जदाराकडे गाय / म्हैस वर्गीय किंवा दोन्ही वर्गाचे मिळुन किमान पाच जनावरे असावीत.)

| अ. क्र. | तपशील | संख्या |
|---|---|---|
| १ | गाय वर्गीय - | |
| २ | म्हैस वर्गीय - | |
| | एकुण | |

९) मुक्तसंचार गोठा बांधणेची जागा अर्जदार/कुटुंबातील व्यक्तिच्या नावे आहे का ? होय/नाही (लागू असेल त्यावर ✓ खूण करावी)असल्यास तपशील-एकर----------गुंठे---------(७/१२,८अ उतारा जोडावा) (किमान १ गुंठा जागा असणे अनिवार्य)

१०) अर्जदाराकडे जनावरांसाठी गोठा आहे का ? होय/नाही असल्यास किती जनावरांसाठी---- अस्तीत्वातील गोठयाचा प्रकार-गवताचे छपराचे /कच्चे बांधकाम/पक्के बांधकाम(लागू असेल त्यावर ✓ खूण करावी ).

## • मुक्त संचार गोठा - प्रकल्प किंमत

| अ. क्र. | बाब | एकूण किंमत रक्कम रु. | ५० टक्के अनुदान रक्कम रु. | लाभार्थी हिस्सा रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | मंजूर आराखडयानुसार मुक्त संचार गोठा तयार करणे | ८१५५५/- | ४०७७७/- | ४०७७८/- |

**११)** या योजनेअंतर्गत माझे प्रकरण मंजूर झालेस त्या दिनांका पासून एक महिन्याच्या कालावधीत १०० % रक्कम मी स्वतः उभी करण्याची जबाबदारी माझेवर राहील. मुक्त संचार गोठा उभारल्या नंतरच योजनेचा ५० % अनुदानाचा लाभ मला मिळणार आहे. याची मला जाणीव असुन अनुदान रक्कम माझे बँक खात्या मध्ये DBT व्दारे जमा करणेत येईल याची मला पूर्ण कल्पना आहे व या बाबत माझी काही तक्रार नाही. योजनेचा प्रारुपामध्ये नमूद केलेल्या माहिती नुसार मी मुक्त संचार गोठयाचे बांधकाम पुर्ण करेन.

मी प्रमाणीत करतो की,अर्जातील अनुक्रमांक १ ते ११ मध्ये नमुद केलेली माहिती पुर्णपणे सत्य आहे.या माहितीमध्ये कोणतीही असत्यता आढळल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी माझ्यावर राहील व त्यामुळे मी उक्त योजनेचा लाभ मिळणेस अपात्र ठरेन अथवा मला योजनेखाली मंजूर करणेत आलेल्या लाभाची वसूली माझेकडून करण्यात येईल याची मला जाणीव आहे. व त्यास माझी पुर्ण संमत्ती आहे.

वरीलप्रमाणे प्रकल्प किंमत ही केवळ अनुदानाची कमाल मर्यादा ठरविणेसाठी असून मुक्त संचार गोठा तयार करणेसाठी बाजार किंमत कमी/अधिक होवू शकते याची मला जाणीव आहे. जादा लागणारी रक्कम मी स्वतः रोखीने उपलब्ध करणेस तयार आहे. प्रकल्प किमतीपेक्षा कमी रक्कमेस मुक्त संचार गोठा प्रकल्प तयार केल्यास अनुदानाची रक्कम ५० % प्रमाणे परिगणीत करण्यात येवून त्याप्रमाणेच देय राहील याची मला कल्पना आहे.

**लाभार्थीचे नाव सही -/-----------------------------**

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे -**

१.फोटो ओळखपत्राची सत्यप्रत (आधार कार्ड / मतदान कार्ड /पॅन कार्ड) **(अनिवार्य).**

२.रेशनकार्ड सत्यप्रत **(अनिवार्य ).**

३.अपत्य दाखला - १ मे २००१ नंतर तिसरे अपत्य नसलेबाबतचा ग्ग्रामपंचायतीचा दाखला **(अनिवार्य).**

४.अर्जदार किंवा कुटुंबातील सदस्य लोकप्रतिनिधी नसलेबाबत ग्रामपंचायतीचा दाखला **(अनिवार्य).**

५.अर्जदाराच्या कुटुंबातील शासकिय सेवेत अथवा सेवानिवृत्त नसलेबाबत ग्रामपंचायतीचा दाखला **(अनिवार्य).**

६.सात बारा व ८ अ उतारा आणि ग्रामपंचायत नमुना नं. ८. **(अनिवार्य).**

७.स्वतःचे नावे जागा उपलब्ध नसलेस जागेबाबत संमतीपत्र

८.आधारलिंकेज बँक बचत खाते पासबुक पहीले पानाची झेरॉक्स /कॅन्सल चेक ची **(अनिवार्य).**

९.जातीचा दाखला (तहसिलदार / प्रांत) सत्यप्रत (मागासवर्गीय असलेस अनिवार्य).

१०.अपंग असल्यास (अपंगत्व प्रमाणपत्र).

---------------------------------------------------------------------------------------------

३

## अपत्य दाखला/प्रमाणपत्र

मी श्री/श्रीमती.(अर्जदाराचे पुर्ण नांव)-----------------------------------------------------,

श्री.(वडीलांचे/पतीचे पुर्ण नांव).------------------------------------------------------------यांचा

मुलगा/ मुलगी/ पत्नी- वय--------वर्षे-----------------रा.--------------------ता,-----------------

जि. सांगली याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो/करते की,

१.मी पशुसंवर्धन विभाग,जिल्हा परिषद सांगली कडील गुराढोरांचा प्रकर्षित विकास अंतर्गत ५० % अनुदानावर मुक्त संचार गोठा तयार करणे या योजने अंतर्गत अर्ज केला आहे.

२.माझ्या आज हयात असलेल्या एकुण आपत्यांची संख्या ----------इतकी आहे.त्यापैकी दि.१ मे २००१ नंतर जन्मलेल्या आपत्यांची संख्या ----------इतकी आहे.

३.दि.१ मे २००१ नंतर माझ्या एकुण हयात आपत्यांच्या संख्येत भर पडुन ती दोन पेक्षा जास्त झाल्यास मी उपरोक्त योजनेतील लाभास अपात्र राहीन याची मला जाणीव आहे.

ठिकाण- **अर्जदाराची सही/आंगठा**

दिनांक- / /२०१८

**ग्रामसेवक सही /शिक्का**

........................................................................................

## लाभाचा /शिफारशिचा दाखला/प्रमाणपत्र

दाखला देणेत येतो श्री/श्रीमती.(अर्जदाराचे नांव)----------------------------------------------

रा.-------------------ता,----------------------जि. सांगली यांनी पशुसंवर्धन विभाग,जिल्हा परिषद सांगली कडील गुराढोरांचा प्रकर्षित विकास अंतर्गत ५० % अनुदानावर मुक्त संचार गोठा तयार करणे या योजने अंतर्गत लाभ मिळणे बाबत अर्ज केला आहे.तरी यापुर्वी यांना या योजनेचा लाभ मिळालेला नाही तसेच अर्जदार यांना लाभ मिळणे बाबत शिफारस आहे म्हणुन दिला दाखला असे.

ठिकाण- **ग्रामसेवक सही /शिक्का**

दिनांक- / /२०१८